# मुंबई विद्यापीठ

परिपत्रक

क्र.मा.सं.वि.क/आयसीसी/२०२२-२३/70

**संदर्भ- No.HRDC/ICC/2022-23/७, दिनांक – १३ जून, २०२२**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/ विभाग प्रमुख, सर. ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व सिंधुदुर्ग उपपरिसरांचे संचालक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, संदर्भिय परिपत्रकानुसार अधिकारी/कर्मचाऱ्यांचे प्रलंबित रजेचे अर्ज विभागप्रमुखांच्या शिफारशीने या विभागास लवकरात लवकर सादर करावेत. तसेच भविष्यात घेणाऱ्या रजेचे अर्ज विभागप्रमुखांच्या शिफारशीने त्या महिन्याच्या हजेरी अहवालासोबत या विभागास सादर करावेत. या पुढे कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या रजेचे अर्ज प्रलंबित राहील्याने काही नुकसान झाल्यास त्यास सर्वस्वी संबंधित कर्मचारी/ अधिकारी व विभागप्रमुख जबाबदार राहतील याबाबत अवगत करण्यात आले होते.

तरी या परिपत्रकाव्दारे विद्यापीठातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, सन २०२२ ची वार्षिक वेतनवाढ अदा करण्यासाठी सेवापुस्ताकातील रजेच्या नोंदी अद्ययावत करण्याकरीता सेवापुस्तकांची पडताळणी केली असता अनेक कर्मचाऱ्यांच्या ब-याच वर्षांच्या रजेच्या नोंदी रजेचे अर्ज प्राप्त न झाल्यामुळे सेवापुस्तकांत करणे प्रलंबित आहेत. तरी ज्या अधिकारी/ कर्मचारी यांचे प्रलंबित रजेचे अर्ज विभागप्रमुखांच्या शिफारशीने तातडीने जमा करण्याची व्यवस्था करण्यात यावी. जर कोणतीही रजा उपभोगली नसल्यास निरंक अहवाल विभागप्रमुखांच्या सही शिक्क्यासह सादर करण्यात यावेत जेणेकरून सन २०२२ ची वार्षिक वेतनवाढ अदा करणे सोईचे होईल. याबाबत विलंब झाल्यास त्यास सर्वस्वी संबंधित कर्मचारी/अधिकारी व विभागप्रमुख जबाबदार राहतील

सदर बाब सर्व संबंधित कार्यालय प्रमुख यांनी आपल्या अधिनस्त कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

29 जून, २०२२
मुंबई - ४०००३२

प्रभारी कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

Circular Marathi

प्रति,

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल,
संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी,
संचालक, रत्नागिरी उपपरिसर,
संचालक, ठाणे उपपरिसर,
संचालक, सिंधुदुर्ग उपपरिसर,
सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे कक्षांचे प्रमुख

(अ) प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित -

१. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव,
२. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल (वित्त व लेखा विभाग)
३. स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ मुद्रणालय.
४. विद्यापीठ अभियंते (फोर्ट परिसर , विद्यानगरी परिसर, रत्नागिरी, ठाणे व सिंधुदुर्ग उपपरिसर)
५. सर्व सहायक कुलसचिव/सहायक कुलसचिव (वित्त व लेखा)
६. सुरक्षा अधिकारी, तसेच सर्व सहायक सुरक्षा अधिकारी.
७. कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख.
८. उद्यान अधिक्षक/अधिक्षक (तांत्रिक) , विधी विभाग
९. स्वीय सहायक (१) कुलगुरु (२) प्र-कुलगुरु(३) कुलसचिव (४) वित्त व लेखा अधिकारी (५) संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ

(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित -

१. सचिव, उ.मा.सा.
२. अध्यक्ष, मुंबई युनिवर्सिटी ऑफिसर्स व वेल्फेअर असोसिएशन (मुनोवा)
३. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ.
४. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना.
५. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना.

प्रभारी कुलसचिव
मुंबई विद्यापीठ